# विविधज्ञानविस्तार.

A MONTHLY MAGAZINE

OF

MARATHI LITERATURE.

FOR

LADIES AND GENTLEMEN.

पुस्तक १. जूलै सन १८६७. अंक १.

## अनुक्रमणिका.

| विषय. | पृष्ठ. |
| --- | --- |
| उपोद्घात | १ |
| विद्यालय.—काव्यविचार. | ३ |
| व्याकरणविवेचन. | ५ |
| स्त्रीबोध.—कन्याविक्रयावर उतारा. | ७ |
| मनोरंजन.—मोचनगड. | ११ |
| स्फुटविषय.—स्त्रियांसाठीं पंचरत्नमाला. | १५ |
| कविता.—करडूं आणि लांडगा. | १६ |

मुक्काम मुंबई

गणपत कृष्णाजी यांचा छापखान्यांत छापिला.

## * भूमिका *

साधारणपणे इतिहासात डोकावून बघितले आणि वर्तमानस्थितीचे अवलोकन केले तरी स्त्रियांच्या समानतेला विरोध असणारी भूमिकाच आपणास दिसून येते. स्त्रीने तिची कार्यक्षमता कितीही कर्तव्यदक्ष राहून सिध्द केली तरीही अवहेलना आणि कुंचबणेचे झुकते माप आजही तिच्या पदरात पडत असतांना पावलो पावली दिसून येते. हृदयात हुंदका आणि डोळ्यांत आसवं दाटून आलेली असली तरी स्त्रिया आपले कुटुंब, समाज आणि त्यांच्याशी निगडीत असलेल्या कर्तव्यात कुठेही कुचराई करीत नाहीत हे दिसून येते. कोणत्याही स्त्री जीवनांत डोकावून बघीतले तरी ती स्वत:साठी कमी जगते आणि इतरांसाठी मन:पूर्वक झटण्यात आणि असे जीवन जगण्यात स्वत:ला कृतार्थ समजते. कुठल्याही दुर्धर प्रसंगाला वादळवेली सारखी सामोरे जाते. तर सुखाच्या प्रसंगात ती तन्मयतेने एकरूप होऊन सुंदर साथ देते. लिप्तता, अलिप्तता, आसक्ती आणि अनासक्ती या दोन्ही गोष्टी ती जीवनात समर्थपणे निभावते. असे असूनही आपल्या समाज, धर्म, परंपरेने मात्र तिची अवहेलनाच करावी. तिचे सामर्थ्य, शक्ती, बुध्दी, प्रेम जास्तीत जास्त कसोटीच्यावर जोखून घ्यावी व असे करण्यात स्वत:ला कृतार्थ मानावे. अशी वृत्ती का? असा विचार चौफेर नजर टाकली की मनात विचारांचे वलय उठते.

भौतिक विज्ञानाकडे प्रगतशीलतेकडे आगेकूच करू पाहणारा समाज आजही पूर्वपरंपरेत इतका गुरफटून गेलाय रेंगाळला गेलाय की तो स्त्रीला स्वतंत्र व्यक्तीमत्व आहे असे अजूनही मानावयास तयार नाही. आजही मुलगा, मुलगी यांच्यात भेदभाव मानला जातो. स्त्री शिक्षणाला वाव सवलत असलीतरी अजूनही या क्षेत्रांत गतीमानता आली नाही. जलधारणा परीक्षेतून मुलगा असेल तर असूदे मुलगी असेलतर नको. कायदे केले असूनही बालविवाह होतात. मुली सती जातात. परित्यक्तांचे प्रमाण वाढतेच आहे. स्त्रीचा एकंदर होणारा कोंडमारा आणि कुचंबणा थांबलेली नाही.

भौतिक ज्ञानमार्गाने वाटचाल करणाऱ्या आपल्या समाजात आज

जर अशी स्थिती आहे तर पूर्वी कशी असेल? ज्या ब्रिटिशांच्या आगमनानी स्त्रियांकडे बघण्याचा एक नवा उदारमतवादी दृष्टीकोन आपणास दिसला आणि दुरावस्था झालेल्या स्त्रीकडे माणूस म्हणून बघण्याचे आपला समाज शिकू लागला. त्या काळातील साहित्याचा अभ्यास करावा रूढी परंपरेच्या दंडू-कशाहीत, अज्ञानाच्या काळ्याकुट्ट बुरख्यात दडलेले स्त्री जीवन कसे असेल? स्त्री विषयक सुधारणांना एकोणिसाव्या शतकांत जे प्राधान्य मिळाले त्यामुळे तिच्या जीवनात खरोखरी परिवर्तन झाले का? झाले असेल तर कसे झाले? कितपत स्त्री सुधारणेचे धोरण समाजाने अंमलात आणले? ब्रिटिशांचे आगमन हे स्त्री जीवनाचा कायापालट करणारा ऐतिहासिक क्षण मानला जातो. मग त्यांच्या आगमना नंतर स्त्री जीवनात कोणते परिवर्तन झाले व साहित्यात त्यांचा वाटा किती असे अनेक प्रश्नांचे वलय मनात उठत होते. लोकहितवादी, ते महात्मा फुले पर्यंत स्त्रियांना त्यांच्या परवशतेतून व जुन्या रूढींच्या शृंख-लातून मुक्त करणारे कार्यकर्ते व त्यांच्या कार्याची प्रभावळ आहे. ती नियत-कालीकांच्या साह्याने अभ्यासने हीच या शोधनिबंधाची भूमिका आहे.

✡

## प्रकरण १ ले

## एकोणिसाव्या शतकातील स्त्री विषयक नियत कालिकांचे

## प्रेरणा, स्वरुप, उद्दिष्टे व

## विविधज्ञान विस्ताराची कामगिरी

आजपर्यंत स्त्री जीवनाचा अभ्यास अनेक अभ्यासू, जिज्ञासू, व्यासंगी लोकांनी केला आहे. हिंदू धर्म संस्कृतिने अनेक अमानुष रुढीच्या शृंखलात स्त्रीला कैद करुन टाकले आहे. मर्यादा आणि शालिनतेच्या गोंडस नावाखाली तिचे व्यक्तिमत्व दडपून टाकले होते. अनिष्ठ पाशवी, धर्म बंधनात गुदमरुन गेलेल्या स्त्रीचा मुक आक्रोश एकोणिसाव्या शतकाच्या आरंभी नवी दृष्टी लाभलेल्या सुधारकांना ऐकू येऊ लागला. आणि त्यांनी धर्म ग्रंथांना प्रमाण मानून, जी हीन विचाराची रुढी, परंपरा स्त्रियांना जखडून टाकीत होती, ते ग्रंथ प्रामाण्य नाकारण्यास सुरवात केली. आणि मानवतावादी नवाधर्म विचार समाजापुढे मांडला, [illegible] स्त्रियांना दास्यातून मुक्त करण्याची प्रेरणा एकोणिसाव्या शतकाच्या आरंभी सुधारकांना मिळाली. [illegible] स्त्री सुधारणेच्या दृष्टीने व दिशेने समाज मनाला जागृत करण्याचे कार्य नियतकालिकांच्या माध्यमातून साकार होऊ लागले.

साहित्य निर्मिती ही सहजस्फूर्तीबरोबर प्रतिभाशाली ज्ञान, भावनाबुध्दी चिंतन मनन यातून होत असते. आणि अशा वेळी समाजाच्या अंतरंगात चालू असलेल्या घडामोडी साहित्याचा विषय, आशय आणि अविष्कार असतो. सामाजिक चळवळीचा परिणाम वाङ्मय निर्मितीवर होतो. तसेच वाङ्मयात तत्कालिन समाजजीवन चित्रीत होत जाते. एकोणिसाव्या शतकातही बौध्दीक, वैचारिक, भावनिक परिवर्तन जीवनाच्या सांस्कृतिक,

धार्मिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रात घडून येऊ लागले. त्याचे साद-पडसाद तत्कालिन साहित्यातूनही उमटले. त्या परिवर्तनाच्या चक्रात प्रामुख्याने स्त्री जीवनाचे मूल्य हे अनन्यसाधारण आहे. पण हे मूल्य जाचक बंधनांनी संपूर्णपणे झाकाळून गेले आहे. व पुरुषी वर्चस्व आणि कर्मकांण्डाचे प्राबल्य यात ती भरडून निघत आहे ही तिची दयनिय, अनुकंपनिय अवस्था आता बदलून टाकली पाहिजे तरचआपला सर्वांगिण विकास होईल. नाहीतर अजूनही कैक शतके आपणास पारतंत्र्यातच राहावे लागेल. तिच्या व्यक्तीमत्वाचे अवमूल्यन का झाले कुणी केले, कसे केले, आणि नव्या विचारसरणीने हे सावट दूर कसे केले? असे प्रश्न समोर उभे राहतात. ते सोडविण्यासाठीच प्रस्तुत प्रबंधात स्त्री जीवनाचा विचार तत्कालिन नियतकालिकांच्या आधारे करावयाचा आहे. माणसाच्या व्यक्तीमत्वाची प्रतिष्ठा ज्या समाजात राखली जाते तो समाज वैभवसंपन्न असतो. ज्या समाजात व्यक्तीमत्वाची प्रतिष्ठा हीन लेखली जातेत्या समाजात अनेक समस्या निर्माण होतात जेंव्हा हा सामाजिक समस्येचा प्रश्न उपस्थित होतो तेंव्हा "स्त्री पुरुष समानता" हा प्रश्न चटकन पुढे उभा राहतो. ही समानता व्यक्तीच्या भावना, बुध्दी, कर्तृत्व, आशा आकांक्षा बुध्दिमत्ता, विचारशक्ती, सामर्थ्य, संवेदनशीलता या गुणांवर आधारीत असते. या सर्व गुणांना जिथे वाव आहे, त्याच्या विकासाला जिथे अडसर नाही तो समाज ख-या अर्थाने वैभवसंपन्न असतो.

या विरुध्द नेमके चित्र धर्माधिष्ठीत हिंदू संस्कृतित आपणास बघावयास मिळते. स्त्रीही समाजाची पुरुषाइतकीच समान घटक असूनही आज पर्यंत तिच्या व्यक्तीत्वाकडे बघीतले असता असे दिसून येते की, गेली कित्येक शतके स्त्रिला सामाजिक प्रतिष्ठातर नाहीच पण व्यक्तीगत प्रतिष्ठाही तिला आपल्या धर्माने दिली नाही. याची कारणे कोणती ? मनुनी तिच्या व्यक्तीस्वातंत्र्यावर प्रथम बंधन घातले. किंबहुना ते नाकारले. आणि तिचे व्यक्तिमत्व, धार्मिक सामाजिक, कौटुंबिक, सर्वच क्षेत्रात संकुचित करुन टाकले. अगदीच प्राथमिक अवस्था सोडली तर जसजशी सत्ता लिपसा वृत्ती, महत्वाकांक्षा वाढली गेली तसतशी स्त्रियांची प्रतिष्ठा कमी होत गेली. स्त्री-

पुरुषप्रधान संस्कृतिमुळे गुलाम बनली. चातुर्वर्ण्याच्या आधारावर असलेली आपली समाजरचना, शूद्राबरोबर स्त्रीलाही गुलाम करून टाकणारी ठरली. धर्म, रूढी, परंपरा या शृंखलेत स्त्री जीवन बंदिस्त झाले. तिचे स्वतंत्र व्यक्तीमत्व समाजाने, मनूस्मृतीने पूर्णपणे नाकारले होते. त्यामुळे आत्मवंचना अवहेलना व अपमानित जीवनाचे दान तिला मिळाले. चातुर्वर्ण्यावर आधारलेल्या आपल्या समाजात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आपल्या अधिकारांचा अवास्तव व अतिरेकी वापर धर्माच्या नावावर करू लागले. शूद्रानांही लुबाडू लागले व त्यातच स्त्री जीवनाचाही समावेश केला गेला. स्त्री ही धर्मनियमनांचे अंधळेपणे पालन करु लागली.

"स्त्री जीवनाच्या उतरत्या कळेचे टप्पे:-

स्त्रियांची ही स्थिती फार पूर्वी पासूनची नाही हे दास्यत्वामुळे निर्माण झालेले तिचे दुर्बलत्व व अबलत्वाचे दान तिच्या पदरी टाकण्यापूर्वी तिचे एकंदर सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रातले स्थान उच्च प्रतिचे होते. उज्वल होते तो काल म्हणजे वेदकाल होय. वेदकालात स्त्री वैदिक व ब्रह्मविद्येचे शिक्षण घेऊ शकत होती. शिक्षणाने होणारा विकास तिच्या व्यक्तीत्वाला पोषक ठरणारा होता. मानसिक विकास साधण्यासाठी शिक्षणाच्या स्वातंत्र्याबरोबर तिला वैवाहिक स्वातंत्र्य होते. त्यामुळे पत्नीची भूमिका ती ख-या सहचर्याने निभावू शकत होती सुशिक्षित आणि सुसंस्कारित अशा बुध्दीचा, मनाचा विकास पूर्णपणे झालेली स्त्री आपल्या मातृत्वाच्या भूमिकेतही परिपूर्ण अशी होती. व्यक्ती विकासाला अडसर वेदकालात नव्हता समाजसंघटनेत स्त्रीला बरोबरीचे स्थान होते.

वेदकालातील समृध्दीला बदलत्या समाज जीवनाने कलाटणी मिळाली. माणसाच्या महत्वाकांक्षी मनोवृत्तीने आर्य अनार्य यांच्यात चकमकी होऊ लागल्या आणि सत्तापिपासू, वृत्तीने मूळची संस्कृती जाऊन आर्य अनार्यांची समिश्र संस्कृती बनली. वेदकालीन सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक नीती नियम कालपरत्वे परिस्थितीनुरूप बदलले आणि "स्मृती"तील मनूनी केलेल्या नियमांच्या बांधीलकीने समाजिक नितीनियम रूढ झाले. प्रचलित

परिस्थितीत मनुने स्त्रियांचे सर्वाधिकार काढून घेतले. तिच्या व्यक्तीमत्वाला पोषक ठरणारे शिक्षण बंद झाले तिच्या वैवाहिकमतस्वातंत्र्यावर गदा आली. आणि या तिच्या आयुष्यातील महत्वाच्या दोन टप्प्यांची दार तिला बंद केली गेली. धर्म, अर्थ, मोक्षाची अधिकारी वाट तिच्यापासून दूर नेली गेली. आणि काम या एका वाटेवर समाजाने तिला स्वत:च्या इच्छेनुसार चालविण्याचा प्रयत्न केला. "पातिव्रत्यधर्म पालनासाठी स्त्रीने मर्यादेच्या चौकटीतच राहिले पाहिजे. त्यासाठी कुल-शील-चारित्र्याचे रक्षण आवश्यक ठरले. आचाराचे विचाराचे मूल्य जोपासण्यास ती असमर्थ आहे तिला पुरुषांच्या सहाय्या शिवाय ही मूल्ये अभंग राखता येणारच नाहीत असे सातत्याने तिच्या मनावर समाज बिंबवत राहिला. आणि स्त्री "अबला"झाली. स्त्रिया समाजात दुय्यम प्रतिष्ठेच्या पातळीवर आल्या. धर्म हा समाजाचा आत्मा बनला, रामायण, महाभारत, कालिदासरचित शिरोधार्य मानल्या जाणा-या महाकाव्यातूनही तिची आत्मवंचना दिसून येते. स्त्रियांच्या आत्मसन्मानाच्या उतरत्या कळेचा अभ्यास करतांना प्रात: स्मरणाला पात्र ठरलेल्या स्त्रिया समाजाच्या संकुचित वृत्तीतून तावून सुलाखून निघालेल्या आहेत. धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चारी पुरुषार्थाची जबाबदारजाण त्यांना होती. हे उघड आहे पण या सगळ्या स्त्रिया महाराणी पदावरच्या होत्या मग त्यांचा आत्मसंन्मान जर त्यांना एवढ्या आत्म समर्पणातून अबाधित ठेवावा लागला तर सामान्य स्त्रियांची स्थिती काय असेल ह्याचा विचारच करवत नाही.

स्त्रियांच्या या अध:पतनाच्या सुरवातीच्या स्थितीने धर्माच्या कर्मकांडाने, कर्मठ संस्कृतीने चांगलेच पाय घट्ट केले. मनुस्मृतीतील नियमांचे पालन आंधळेपणाने होऊ लागले. ब्राह्मणांनी अध्ययनाचे सर्वाधिकार स्वत:कडे घेतले. बहुजन समाजाबरोबर स्त्रिया पण अज्ञानाच्या अंध:कारात लोटल्या गेल्या. बौध्द जैन धर्माच्या उदयामुळे ब्राह्मणी वर्चस्वाचे सावट कांही काळ दूर व्हायला सहाय्य झाले पण फार काळ हीपण स्थिती तग धरु शकली नाही. परकीयांची सातत्याने होणारी आक्रमणे यामुळे जनजीवन अस्थिर व असुरक्षित झाले. याचा परिणाम स्त्री जीवनावर झाला. परकीय आक्रमणाच्या

पुन: चक्रीहाही सनातनी विचारांचे वलय आपला समाज सोडू शकला नाही. १३ व्या शतकापर्यंत या प्रमाणे सामाजिक स्थित्यंतरे होत गेली. महानुभावपंथ आणि भागवतधर्माच्या आगमनाने स्त्रियांना परत एकदा व्यक्ती स्वातंत्र्याची आशा दाखविली. लौकिक जीवनाच्या यशस्वीतेपेक्षा पारलौकिक जीवन महत्वाचे वाटू लागले. भक्ती मार्गाने कुणालाही हे जीवन साधता येते. असा दिलासा दिला गेला. पण लौकिक जीवनाचा त्याग हे सर्वसामान्यांना न साधणारे लक्ष होते. त्यात ब्राह्मणी आराजकता, परकीयांचे धार्मिक व राजकीय आक्रमण ही स्त्री जीवनाला उतरतीकळा आणणारी कारणे. तसेच आपली संस्कृति ही परंपरापूजक आहे. म्हणूनच मनुस्मृतितील वचनांना आपण आंधळेपणाने अंमलात आणले. रामायण, महाभारतातील स्त्रीला वंदनीय केले. तरी एकीला रामाच्या पुरूषार्थाची प्रभावळ आहे तर दुसरी मागे धर्म युध्दाची प्रस्तावना आहे. त्यांचे व्यक्तीगत जीवन हे त्यांच्या व्यक्तीत्वाचा अनादर करणारेच आहे.

जैन, बौध्द संप्रदाय अवतरले. पण तिथेही संपूर्णपणे स्त्रीच्या स्वतंत्र व्यक्तीमत्वाला स्थान नव्हते तर फक्त तिच्या प्रवेशाला अनुमती होती. पंडीतांनी तिला शृंगाराची देवता मानली. आणि तिच्या सौंदर्याची रसभरीत आरास केली पण तिच्यातील सुंदर अंतर्गत गुणांचा साक्षात्कार त्यांना कधी झालाच नाही. वारकरी संप्रदायातही स्त्री ही पारलौकिक जीवनातला मोठा अडसर मानली गेली व नरकाचे व्दार या दृष्टीने तिच्याकडे बघीतले जाऊ लागले. स्त्रीही आदीशक्ती आहे हे मान्य होते. साडेतीन पिठे तिच्या ह्या आदिमशक्तीचे पूजक होते. तिचे सामर्थ्य, कर्तृत्व, अलौकिक आहे. ती निर्मीकाने निर्मीली आहे आणि नवनिर्मितीची अलौकिकशक्ति तिला ईश्वरानेच प्रदान केली आहे हे अंतिम सत्य सगळ्यांना ठाऊक असूनही वरील विवेचनावरून तिच्या जीवनाचे अवलोकन करतांना हे स्पष्ट दिसून येते. धर्मग्रंथांच्या प्रामाण्याने आपण इतके दुबळे झाले होतो की तिच्यातील शक्ती आणि सामर्थ्याचा त्यामुळे दुरूपयोग केला जात होता. अविवेकी

नियमांची सुरुवात झाल्यामुळे समाजोन्नती घसरणीला लागली होती. त्याचे एकमेव कारण म्हणजे स्त्रियांचे डावलेले अधिकार, उच्चभ्रू समाजाने माजविलेली अराजकता या सर्वांत स्त्री निर्दयपणे भरडून निघाली. व तिच्या मूळ सोशिकतेने या सर्वांना प्रोत्साहन दिले गेले.

१९वे शतक आणि स्त्री जीवनाचे स्वरूप:-

स्त्रियांच्या अवन्नतीची कारणे शोधतांना प्रामुख्याने "स्त्री" ही धर्मांनी घालून दिलेल्या जाचक, जीवघेण्या बंधनात जखडली गेली होती. "स्त्रीच्या जीवनातील प्रत्येक क्षण हा धर्म, परंपरा आणि रूढीच्या मर्यादांने कटीबध्द झाला होता. बालविवाह, पुनर्विवाहास बंदी, विधवांच्या समस्येतील सगळ्यांत जीव घेणा आणि समाजाला, मानवतेलाही कलंकीत करेल असा केशवपनाचा प्रश्न, आणि या सर्वांना पोषक ठरलेला तिचा अज्ञानाचा वारसा, या सर्वांवर असलेले धर्माचे अधिष्ठान, धर्माचे वर्चस्व, यामुळे स्त्रियांची स्थिती अधिकच खालावली. धर्माच्या या अनियंत्रित बंधनाने तत्कालिन समाजाची धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक मूल्ये रसातळाला जाऊ लागली. आणि याच कमकुवतपणाचा फायदा ब्रिटिशांनी उचलला आणि त्यांच्या उदारमतवादी भूमिकेतून तत्कालीन समाज अंतर्बाह्य जागृत होऊ लागला. पाश्चात्य संस्कृती ही जिज्ञासू, ज्ञानपिपासू आणि बुध्दीनिष्ठ तत्वावर जोपासली गेलेली होती. अशा संस्कृतीशी आपला संबंध येताच, आपलाच धर्म श्रेष्ठ, व भूतलावर आपल्या इतके सुसंस्कृत कुणी असूच शकत नाही, अशा विचारसरणीला धक्के बसू लागले. धर्म परंपरेवर जोपासल्या गेलेल्या संस्कृतित वैचारिक मंथन होऊ लागले. आपले जीवन म्हणजे वाढ खुंटलेल्या रोपासारखे आहे. याची जाणीव होऊ लागली. व या खुरटलेपणातून बाहेर येऊन आत्मविकास साधण्याची गरज लोकांना वाटू लागली. स्त्री दास्य विमोचनाच्या प्रेरणेने परिवर्तनाला सुरवात झाली. हा आत्मविकास धर्मबंधनात अडकला होता. "धर्म हे समाजाचे हृदय आहे आणि त्याच्या सर्व व्यवहारांत जर सुधारणा परिवर्तन किंवा क्रांती व्हावयाची तर प्रथमत: त्याच्या या हृदयात परिवर्तन झाले पाहिजे."[१] म्हणजे धर्माधिष्ठीत

समाजात आपोआप सुधारणा होईल व समाजाची उन्नती घडून येईल असा विचार करण्यास समाज प्रवृत्त झाला. अंधानुकरणाची परंपरा टाकून डोळसपणे कालसापेक्ष धर्म रुढ करण्याची गरज तत्कालीन समाजाला वाटू लागली. भूतदया, बंधुभाव, समता हे धर्माचे मूलतत्व आहे हे लोकांना पटू लागले आणि मग त्यातील कांही द्रष्टया लोकांनी स्वसंस्कृतीची जहणघडण करणा-या सामाजिक नीतिमूल्ये जीवापाड जोपासणा-या, अशा उत्तम कारागिरालाच आपण जायबंदी केले आहे. एवढेच नाहीतर अन्याय आणि अत्याचाराने तिची अस्मिता आपण झाकाळून टाकली आहे हे लक्षात आले. आणि धार्मिक आचार-विचारांच्या जाचक जीवघेण्या बंधनातून प्रथम स्त्रीला बाहेर काढले तरच हे शक्य आहे. याची खात्री अशा सहृदय विचारवंताना वाटू लागली. या धार्मिक, सांस्कृतिक संक्रमणाला चालना दिली गेली ती १९व्या शतकातील ब्रिटिशराज्य स्थापनेने हया सुधारणेच्या विचारांचा उदय म्हणजेच "१९व्या शतकाने एका अर्थाने स्त्री मुक्ती लढयाची वैचारिक पार्श्व-भूमी तयार करुन ठेवली."[२] असे म्हटल्यास काहीच वावगे ठरणार नाही.

प्रबोधन आणि परिवर्तनाचा मूलगामी विचार करुन प्रयत्न पूर्वक विचारआचार परिवर्तनाची सांगड घालण्यास १९ व्या शतकांत सुरवात झाली. १७ व्या शतकात परकियांच्या धार्मिक आक्रमणाने व्यापून गेले होते तर १९ व्या शतकाच्या मध्यापर्यंत अंतर्गत बंडाळी, असुरक्षितता, सबल घटका-कडून दुर्बल घटकांवर होणारे अमानवी, पाशवी अत्याचार, गतानुगतिक धर्मविचारांचे अंधानुकरण, संकुचित आणि स्वार्थी लोभी, मनोवृत्ती, पेशवे-कालीन सुखलोलुपता आणि ब्राह्मणी वर्चस्वाची विलक्षण अराजकता, रुढीचे प्राबल्य, परंपरेचा मुखवटा, यामुळे आपली सर्वांगीण अवन्नती झाली. आणि धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक मानहानीही झाली. या मानहानीची बोच १९व्या शतकात प्रकर्षाने होऊ लागली. पाश्चात्य संस्कृतितील आद्ययावत प्रग-तीचा फायदा उन्नतीसाठी करुन घेण्याचा विचार कांही लोक करु लागले. त्यांनाच आपण द्रष्टे, कळकळीचे समाजसुधारक असे म्हणतो.

समाजसुधारकांनी प्रामुख्याने स्त्री-पुरुष हे दोन्ही घटक समान

आहेत. स्त्रीला व्यक्तीस्वातंत्र्य देणे ही समाजाची अपरिहार्य गरज आहे. स्त्रियांच्या संवेदनशील मनाला जागृत करून समाजोन्नतीला बाधा आणणाऱ्या जुन्या, टाकाऊ धर्मबंधनांचे "जू" तिच्या खांद्यावरून उतरवून टाकून तिच्या कर्तृत्वाचे क्षेत्र वाढविले पाहिजे. तरच समाजोन्नती लवकर साधली जाईल असा परिपक्व विचार मांडला जाऊन जुन्या विचारांच्या पुनर्मूल्यमापनावर नव्या सशक्त व सबल विचारांचा प्रभाव जनमानसावर पडू लागला. व प्रबोधनाला सुरुवात झाली. ती या प्रक्रियेतून.

नियतकालिक व त्यांची कामगिरी:-

परिवर्तन आणि प्रबोधनाच्या विचारांची आवश्यक प्रामुख्याने जर कुणी केली असेल तर ती नियतकालिकांनी, पाश्चिमात्यांनी बरोबर आणलेल्या आधयावत प्रगतीत मुद्रणकला ही भारतात आणली. आणि लिहीलेला मजकूर आवश्यक तितक्या प्रति काढून दूरवर पाठवण्याचे एक माध्यम आपल्याला हस्तगत झाले. यातूनच समाजसुधारकांनी "सामाजिक परीस्थितीत शिरलेला कमालीचा मागासलेपणा, अनर्थकारी रूढींचे वर्चस्व, समाजाच्या अंगोपांगात शिरलेला निष्ठूर कर्मठपणा, अंधश्रध्दा, सहिष्णूतेचा अभाव जन्मापासून मृत्यू पर्यंत धार्मिक संकेतांनी जखडले गेलेले व्यक्तिजीवन,-सणवार------- स्त्रिया व बहुजन समाज यांच्यातील निरक्षरत्व व त्यांची होणारी सर्व कुचंबणा."[२] या सर्व प्रश्नांचा वैचारिक दृष्टीने उहापोह करायला सुरुवात केली. सुधारकांच्या अंतर्मनाला स्त्रीच्या व्यक्ती विकासाची गरज वाटली आणि त्यातूनच आत्मविश्वासाने ते स्त्री सुधारणे विषयी नियतकालिकांतून लिहू लागले. बाळशास्त्री जांभेकर, विष्णूबुवा ब्रह्मचारी; लोकहितवादी, भांडारकर, गो. ग. आगरकर, महात्मा जोतिराव फुले इत्यादि समाज सुधारकांनी महाराष्ट्रातील स्त्रीला धार्मिक कर्मकाण्डाच्या गर्तेतून बाहेर काढले. आणि त्यांना त्यांची सामाजिक प्रतिष्ठा पुन्हा मिळवून देण्याचा प्रयत्न केला. बाळशास्त्री जांभेकर, विष्णूबुवा ब्रह्मचारी, लोकहितवादी या समाजसुधारकांनी वैचारिक पार्श्वभूमी तयार केली. स्त्रीला शिक्षण द्यावे, पुनर्वि-

वाहास संम्मती असावी, बालविवाहाची प्रथा बदलून टाकून स्त्रीचा मनोविकास व शारिरीक विकास झाल्याशिवाय तिचे लग्न करु नये. तिच्या संम्मति शिवाय तिचे लग्न करु नये. सतीची चाल अनिष्ठ व समाजाला घातक अशी आहे. ती बंद व्हावी, जरठबालीविवाह, ही रूढी नष्ट व्हावी. प्रथम स्त्रीला शिक्षण देऊन तिला ऐहिक जीवनाचे धडे द्यावे व मग पातिव्रत्याच्या मूल्या विषयी शिकवावे, शिकवून सुशिक्षित केलेली स्त्री, सुसंस्कारित पिढी निर्माण करेल व सामाजिक उत्थापनास गती येईल, बालहत्याप्रतिबंधक नियम करावेत, विधवास्त्रीला स्वत:चा चरितार्थ चालविण्यासाठी कांही पोटगी द्यावी. अशा प्रकारच्या सतर्क व बुध्दीनिष्ठ विचारांच्या पार्श्वभूमीवर "फुले आगरकरादि सुधारकांनी स्त्रीला, तिची अस्मिता दिली आहे. म्हणून स्त्रीला अगतिकतेकडून अस्मितेकडे गुलामगिरीतून स्वातंत्र्याकडे, सांस्कृतिक कालोखातून नव्या संस्कृतीच्या प्रकाशाकडे जाण्याची शक्यता निर्माण झाली."[४] फुले आगरकरांनी सक्रिय भूमीकेत स्त्रीच्या उध्दाराला गती दिली; स्त्रियांच्या बाह्य सौंदर्या विषयी महाकवी, पंडीतकवी रसरसून वर्णन करत होते. किंवा तिच्या सद्गुणांना मानवी पातळी वरून देवतांच्या गणनेत सामील करीत होते. पण तिच्या मानसिक सौंदर्याचा विचार मानवी, व माणूसकीच्या पातळी वरून आजवर कधी झालाच नव्हता. १९व्या शतकाच्या प्रारंभी मात्र हा विचार होऊ लागला स्त्रीचे अंतरंग मानवी पातळीवरून बघीतले जाऊ लागले.

## महाराष्ट्रात नियतकालिकाचा उदय व विकास:-

एकोणिसावे शतकच नवनिर्मितीचा कालखंड म्हणून ओळखला जातो. त्यातच नियतकालिकांचा उदय नवीन विचार सरणीचे मूल्य समाजातील सर्वथरातील लोकांना कळविण्यासाठी झाला. समाज प्रबोधनाच्या प्रेरणेने निरनिराळ्या प्रस्तावनेने अनेक नियतकालिके सुरु झाली असली तरी त्यांचे उद्दिष्ट मात्र एकच होते. कालबाह्य जाचक धर्मबंधनांचा त्याग आणि जीवन सर्वार्थाने फुलविणाऱ्या विद्येचा स्विकार व धर्मातिल कर्मठतेवर बहिष्कार. निरनिराळ्या

प्रेरणांनी प्रेरीत होऊन अनेक प्रकारची उत्कृष्ठ नियतकालिक या काळात निघाली. व ज्ञान प्रसाराचे कार्य त्यांनी केले. भविष्यकाळाची जडणघडण करण्याची नैतिक जबाबदारी, सामाजिक बांधीलकीतून, कर्तव्यातून, आत्मीयतेने त्यांनी निभावली.

१८३२ ते १८६७ या कालखंडात विविध नियतकालिके निघाली. त्यांच्यामुळे बुरसटलेल्या विचारांवर हल्ला झाला. ग्रंथप्रामाण्यालाच चिकटून बसलेल्या सवर्णीयांची वृत्ती उघडकीला येऊ लागली. निर्भीड, सडेतोड आणि निकोप टीका त्यांच्यावर केली गेली. आणि त्यांच्या विचारशक्तीला जागृती देण्याचा यशस्वी प्रयत्न झाला. सनातनी म्हणविणारे लोक सुधारकांची मते खोटी ठरविण्यासाठी तरी धर्माचा अभ्यास करु लागले. आपल्या आचार विचारांकडे बघु लागली. व हळूहळू स्थित्यंतर आणि संक्रमणाची प्रस्तावना होण्यास सुरवात झाली. याला एकमेव कारणही ते पाश्चात्याकडून आलेला उदारमतवाद आणि शिक्षण. "लोकशिक्षणाचे एक समर्थ माध्यम म्हणून नियतकालिके निघु लागली."[५] हिंदूधर्मातील दोष व व्यंगे दाखवून तो अधिक शुध्द करण्याचा प्रयत्न होऊ लागला. महाराष्ट्राच्या नियतकालिकांच्या इतिहासातील पहिले नियतकालिक बाळशास्त्री जांभेकरांनी "दर्पण" हया नावाने सुरु केले. सामाजिक स्थित्यंतराचे प्रतिबिंब या दर्पणातून स्पष्ट होऊ लागले. इ. स. १८३२ ला महाराष्ट्रात "दर्पणा" पासून नियतकालिकांचा ज्ञान प्रसाराचा व ज्ञानसंवर्धनाचा काल सुरु झाला. पाठोपाठ (१८३४)"दिग्दर्शन" व्यवहारोपयोगी ज्ञान आणि विद्यासाहित्याचे दिग्दर्शन होण्यास प्रारंभ झाला. लोकहितवादीसारख्या बुध्दीमान समाजसुधारकाने १८४० मध्यें निघालेले भाऊ महाजनी यांचे "प्रभाकर" या नियतकालिकांतून हिंदूस्थानच्या अवन्नतीची कारणे निदर्शनास आणून देऊन त्यांच्या उज्वल कालाची दिशाही दाखविली. स्त्रियांच्या अवन्नतीची कारणे सांगून स्त्री सुधारणेला प्राधान्य दिले. मराठी साहित्यात आपला वैचारिक आणि साहित्यीक ठेवा शतपत्राच्या रुपाने समाविष्ट केला. त्यानंतर अनुक्रमे "ज्ञानोदय" (१८४२) उपदेश चंद्रिका १८४४ मध्ये ही नियतकालिके निघाली. १८४९ इंदु प्रकाश, १८५४ मध्ये

वर्तमान दिपिका, १८६२ मध्ये इंदुप्रकाश ही नियतकालिके सुरु झाली. १८६७ मध्ये रा. श्री. गुंजीकर यांनी विविधज्ञान विस्तार हे दीर्घकाल टिकलेले जवळजवळ ७० वर्षाचा कालावधी या नियतकालिकाचा वेगळा ठसा उमटविणारे ठरले. त्याआधी १८६४ मध्ये सखाप्रभु यांनी "स्त्रीभूषण" हे नियतकालिक सुरु केले होते. त्यात संपादकानी जे आपले ब्रीदवाक्य ठरविले ते प्रस्तुत शोध निबंधात नमूद करण्या सारखे आहे.

> " देशस्थिती सुंदर व्हावयाते
> ज्ञानी कराव्या आधीं हो स्त्रियाते
> सूज्ञा दिसे मुख्य उपाय नाही
> या वाचूनी अन्य उपाय नाही."[६]

स्त्रियांना सद्‌शिक्षण देण्या वाचून गत्यंतर नाही हया विचारांनी हे प्रेरीत झालेले नियत कालिक होते. आत्तापर्यंत निघालेल्या नियतकालिकातून स्त्रीयाच्या उत्थापनाची नितांत गरज बोलून दाखविली जात होती. तिची निकृष्ठावस्था हेच आपल्या आत्तापर्यंतच्या अवनतीचे कारण, हेच आपल्याला परतंत्र होण्याचे कारण आहे हे निदर्शनास आणून दिले गेले.

याच कालखंडात निघालेले विविधज्ञान विस्तार, आपल्याला आलेली अवकळा, निकृष्ठावस्था दूर व्हावी व आपले धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक व सामाजिक सर्व क्षेत्रांत प्रगतीचे पाऊल उचलले जावे या एकमेव तळमळीने हया नियतकालिकाने कार्य केले. "स्त्रियांच्या आत्मवंचनेचे दुःख बोलले जाऊ लागले. समाजाने त्याची नोंद घ्यावी आणि भावनिक पातळी बरोबरच वैचारिक दृष्टीने स्त्रियांच्या उपेक्षित जीवनाचा विचार व्हावा या दृष्टीने हे मासिक अत्यंत अग्रेसर ठरले. बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी, विष्णूबुवा ब्रह्मचारी यांनी निर्माण केलेली वैचारिक पार्श्वभूमी, या नियतकालिकाला निश्चित उपयुक्त ठरली. कारण १८३२ ते १८६७ हया कालात हे विचार बीज इथे रुजू घातले होते. व अनुकूल प्रतिकूल, पुरोगामी, प्रतिगामी विचारांची प्रतिक्रीया समाजमनावर वादळे उठवू लागली होती. अनेक लेखातून अनेक विचारवंतानी, आणि साहित्यीकांनी आपले हे समाज प्रबोधनाचे कार्य

व स्त्रियांच्या जीवनाला मिळणा-या वेगळ्या दिशेचा दूरगामी दृष्टीने विचार केला. " ज्या देशात स्त्रियांचे अधिकार लोक मानीत नाहीत त्या देशात लोकांची स्थिती वाईट असते. हिंदू लोकात फारच मूर्खपणा आहे. वास्तव स्त्रियांची दुर्दशा फारच आहे."७ हे लोकहितवादीनी स्त्रियांच्या उपेक्षित जीवनाचा सर्वांगिण विचार करतांना व त्याचे दुष्परिणाम समाजावर होतांना काढलेले परिपक्व उद्गार. विविधज्ञान विस्तारातील लेखांचा अभ्यास करतांना त्यातील यथार्थता जाणवते.

लोकांची मतप्रणाली बदलणे, अभिरूची वाढविणे, वाचक बहुश्रुत करणे, तर्काधिष्ठीत विचारांची सवय वाचकाला लावणे, सद्विचार आणि सतर्क विचारांवर नवी नितीमूल्य कशी जोपासली जातील हे कार्य. "कुलस्त्रिया आणि सद्गृहस्थ यांच्यासाठी उदयाला आलेल्या विविधज्ञान विस्ताराने केले. त्याचे स्वरूप विविधांगी व व्यापक असे होते. काव्य,नाटक, कादंबरी, चरित्र, प्रवासवर्णने, निरनिराळी भौतिक व आध्यात्मिक शास्त्रे, धार्मिक सामाजिक जीवनावर प्रकाश टाकणारे लेख, कौटुंबिक व सामाजिक जाणीवांची स्त्रीच्या दृष्टीने घेतलेली दखल, गृहशिक्षण, सद्गुणी स्त्री, कुटुंबशिक्षा, स्त्रियांसाठी पंचरत्नमाला, स्त्री तेज, गुणवती स्त्री अशा वैचारिक पैलूतून , लेखातून सामाजिक, धार्मिक,सांस्कृतिक दृष्टीकोनातून या नियतकालिकांने आपली कामगिरी बजावली. आणि अवलोकन अनुभवातून हे नियतकालिक प्रतिष्ठेच्या शिखरावर पोहचवले. "विविधज्ञानविस्तार म्हणजे मराठी नियतकालिकांतील कौस्तुभमणी मानावा लागेल, इतके त्याचे तेज दैदिप्यमान आहे. विविधता, विव्दत्ता, आणि विदग्धता, या तिन्ही दृष्टीने त्याचे कार्य अमोल आहे. लोकांना बहुश्रुत व सज्ञान करण्याची गरज ओळखून रा. भी. गुंजीकरांनी विविधज्ञान विस्ताराचे प्रयोजन सुरु केले."८ विविधज्ञान विस्ताराचे संपादक रा. भी. गुंजीकर होते. संपादकांचे नाव लिहिण्याची प्रथा त्या काळात नव्हती पण रामचंद्र भिकाजी गुंजीकरांनी याची धुरा सांभाळली होती. तत्कालीन समाजजीवनाचे यथायोग्य सादपडसाद बघावयाचे असतील तर ते विविधज्ञान विस्तार या नियतकालीकाच्या आभ्यासातून बघता येतात. गुंजीकरां-

सारख्या व्यासंगी विचारवंताची छाप या नियतकालिकावर होती त्यामुळे ह्या नियतकालिकाला सुरवाती पासूनच प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. नियतकालिकाचे शिर्षकच त्याचा उद्देश्य स्पष्ट करते. तत्कालीन जीवनावर प्रभावीपणे वैचारिक, भावनिक, मानसिक, पातळीवर संवेदनक्षमता, जागृत करून वैचारिक पातळी वाढवून समस्यांचे दर्शन घडवून त्यावर उपाय योजना दाखवून देण्याचे कार्य विविधज्ञान विस्ताराने केले. जाणीवेच्या पातळीवरून सामाजिक जीवनाची स्पंदने विविधज्ञान विस्तारातून टिपली गेली. आणि म्हणूनच आपल्या दीर्घ कालखंडात स्त्री विषय लेखातून आणि स्त्रियांनी लिहिलेल्या लेखातून, कवितातून स्त्रीविषयक सुधारणेचा एक सूर जुळला जातो. त्याचा सांगोपांग विचार करणे हा या शोध निबंधाचा उद्देश्य आहे. "स्त्री" जीवनाशी संबंधीत असलेल्या लेखातून समाज प्रबोधनाची दिशा आजमावता येईल. व आजच्या स्त्री विषयक प्रश्नाचा सांधा जुळवता येईल. "जुन्या मासिकांचे वाचन या प्रकारे पृष्ठ संख्येच्या मानाने मनात पुष्कळच विस्तारत जाते. पूर्व काळात सांस्कृतिक जीवनात धडपडलेल्या आपल्यासारख्या कांही पिढयाशी त्या निमित्ताने आपला एक संवाद सुरु होतो."[९] आणि त्यातूनच तत्कालीन स्त्री जीवन व आजचे स्त्रीजीवन यांचे काही दुवे साधता येतात. पुढील प्रकरणात याचा सविस्तर विचार करून १९व्या शतकातील या मौलिक नियतकालिकाने स्त्री विषयक प्रश्नांवर टाकलेला प्रकाश, त्यांच्या समस्या सोडवण्याचे केलेले प्रयत्न त्यातील साहित्यिक मूल्य, वैचारिक पार्श्वभूमी आणि लेखांच्या अनुरोधाने तत्कालीन महाराष्ट्रातील स्त्रीजीवन याचा विचार करावयाचा आहे.

तत्पूर्वी १८६७ ते १९३७ या विविधज्ञान विस्ताराबरोबर कार्य करणा-या स्त्री संपादिकांच्या अनेक नियतकालिकांचा नामोल्लेख करणेही गरजेचे आहे. काव्यार्थ दीपिका, दंभहारक, सत्दीपिका, निबंधमाला, बाल-बोधमेवा, करमणूक, मनोरंजन ही नियतकालिके निघाली. यातूनही स्त्रियांच्या बाह्य सौंदर्यापेक्षा स्त्रियांच्या अंत:रंगात डोकावून तिचे सद्गुणांचे सौंदर्य टिपले गेले. या शिवाय विधवांचे प्रश्न, बालविवाहाची अनिष्ठ चाल, अनाथ स्त्रि-यांची समस्या केशवपना सारख्या घृणा आणणा-या चालीवर बंदी. पुनर्विवाहास

संमती• अशा प्रकारच्या दारूण आणि करूण समस्याकडे बघितले जाऊ लागले•

स्त्रियांना ज्ञानाचा प्रकाश दाखवून त्यांना आत्मसन्मानाचे धडे दिले गेले व स्वावलंबी होण्याचा मार्ग दाखविला• आत्मविश्वास तिच्यात निर्माण करण्याचा प्रयत्न केला गेला त्यांच्या अस्मितेची जाणीव हेतूपुर:सर करून देण्याचे प्रयत्न होऊ लागले• व त्यासाठी सर्व वाङ्मय प्रकाराचा उपयोग करून घेतला जाऊ लागला• "अबला मित्र १८७६, खास स्त्रियांकरिता निघालेले नियतकालिक• "भारत वर्षीय अबला जनाची विद्यमान काळीची निकृष्ठावस्था झाली आहे ती पाहून खरोखर सहृदय मनुष्याचे अंत:करण कळवळल्या वाचून राहणार नाही• ज्या स्त्री जनास महाज्ञानी व त्रिकालज्ञ जे आपले पूर्वज ते देवा प्रमाणे मान देत असत व ज्या आपल्या विद्वत्तेने आणि चातुर्याने महाजनांमध्ये प्रशंसनीय व पूज्य मानल्या जात असत त्यांची उकिरड्यात पडलेल्या रत्नाप्रमाणे अवस्था झाली आहे• ज्या स्त्रियापूर्वी सृष्टयुत्पत्तीस कारणीभूत मानल्या जात असत त्यासच हल्ली सूज्ञजन अहंपणाने व दुराग्रहाने केवळ भोगजन्य मानून त्यांच्याशी व्यवहार करतात ही किती दु:खाची गोष्ट आहे "[१०] असा स्त्रीजीवनांच्या दुर्दशांचा उल्लेख सतत केला जाऊ लागला• स्त्री सद्बोध चिंतामणी अंकुश रामचंद्र गेडिकर यांनी १८८१ साली संपादित केले तर १८८६ साली स्त्रीच्या मानसिक सौंदर्याची जोपासना करणारे "स्त्री सौंदर्य लतिका हे नियतकालिक आ• रे• पेणकर यांनी सुरु केले• स्त्रिसुधारणेचा दृष्टीकोन मानसशास्त्रीय दृष्टीने विचार करून मांडला गेला होता, तर "गृहिणी" हे नियत कालिक "बळवंतभाऊ नगरकर" यांनी १८८७ साली सुरु केले• गृहस्थधर्म हा आपल्या संस्कृतिचा मौलिक गाभा आहे• आणि तो धर्म पालन करण्याची जबाबदारी ख-या अर्थाने स्त्रीवर असते• म्हणून ती सूज्ञ, सुशिक्षित, व सन्मार्गवर्ती असणे आवश्यक ठरते• त्यासाठी तिने सुशिक्षण घेणेही गरजेचे आहे• तरच ती सुसंस्काराचे मोल टिकवून धरील हा या नियतकालिकाचा उद्देश्य, प्रेरणा व स्वरूप आहे•

या नियतकालिकांप्रमाणे अजूनही नियतकालिके निघाली पण सर्वांचा आढावा घेणे इथे शक्य नसल्याने संक्षेपाने इथे विविधज्ञान विस्ताराच्या

आधीचे आणि समकालीन असणाऱ्या नियतकालिकाचा नामनिर्देश केला आहे. "या सर्व नियतकालिकांच्या भरीव कार्याचे स्वरूप थोडक्यात असे की, त्यांनी आपल्यापरीने प्रबोधनाचे कार्य केले. सुशिक्षित समाजात चिकित्सक बुध्दी वाढीवली समाजाला विचारप्रवृत्त करून विचार स्वातंत्र्याची भावना त्यांच्यात निर्माण केली. ज्ञानाची लालसा निर्माण केली. आत्मनिरीक्षणाची सवय लावली. आणि मराठी भाषेत नवे विचार, नवे लेखन व नवे लेखक उदयाला आणले."[११] या सर्व नियतकालिकात कौस्तुभमणी ठरलेल्या विविधज्ञानविस्तारातील स्त्री विषयक लेखांचा चिकित्सक अभ्यास पुढील प्रकरणा पासून करावयाचा आहे. व त्याची वैशिष्ठ्यपूर्ण कामगिरी, स्त्रीजीवनविषय दृष्टीकोन आजमावयाचा आहे. त्यातून दिसणारे महाराष्ट्रातील स्त्रीजीवन, स्त्री विषयीक लेखातील वैचारिकता, साहित्यिक सौंदर्य त्या लेखांच्या अनुषंगाने अभ्यासावयाचे आहे.

प्रस्तुत प्रकरणात नियतकालिकांचे प्रेरणा, स्वरूप व उद्दीष्ट बघितली. स्त्रियांच्या जीवनात घडवून आणणाऱ्या विचारांची प्रेरकता आजमावली, त्याची नितांत गरज हे १९व्या शतकाचे वैशिष्ठ्य ठरले. त्यादृष्टीने विविधज्ञानविस्ताराची भरीव कामगीरी पुढील प्रकरणात अनुक्रमे अभ्यासावयाची आहे.

## संदर्भ सूचि


| | |
|---|---|
| १) आचार्य शं. द. जावडेकर | आधुनिक भारत<br>ति आ. पान न. ४६ |
| २) भालचंद्र फडके | मराठी लेखिका चिंता<br>आणि चिंतन<br>आ.<br>पान न. १२ |
| ३) रा. श्री. जोग | मराठी वाङ्मयाचा इतिहास<br>प्र. आ.<br>पान नं. ५८ |
| ४) भालचंद्र फडके | मराठी लेखिका चिंता<br>आणि चिंतन<br>पान नं. २५ |
| ५) सदा क-हाडे | अर्वाचीन मराठी<br>साहित्याची सांस्कृतिक<br>पार्श्वभूमी<br>आ. प.<br>पान नं ४३ |
| ६) सं. शं. ग. दाते<br>दि. वि. काळे<br>शं. ना. बर्वे | मराठी नियतकालिकांची<br>सूचि खंड १<br>कालिक कोष<br>प्र. आ. पृ. ३८९ |

| | |
|---|---|
| ७) सं॰ अ॰ का॰ प्रियोळकर | लोकहितवादी<br>निबंधसंग्रह शतपत्रे<br>स्त्रियांची स्थिती<br>आ॰ प॰ पान नं॰ ३० |
| ८) सौ॰ सुहासिनी दत्तात्रय<br>जहागिरदार | १८५० ते १९२० या कालखंडा-<br>तील मराठी वाङ्मयीत<br>नियतकालिकानी मराठी<br>वाङ्मयात विचारात घातलेली<br>भर मार्गदर्शक प्रा॰ वा॰ल॰<br>कुलकर्णी<br>पान नं॰ ३४,३५ |
| ९) सरोजिनी वैद्य | संक्रमण<br>आ॰ प॰<br>पान नं॰ १५२ |
| १०) संपादक शं॰ ग॰ दाते | मराठी नियतकालिकाची<br>सूचि<br>कालिक वर्णन कोष<br>पान १९० |
| ११) स॰दा॰ क-हाडे | अर्वाचीन मराठी साहित्याची<br>सांस्कृतिक पार्श्वभूमी<br>इ॰स॰न (१८ ते १९४७)<br>प्र॰ आ॰<br>पान नं॰ ४७ |